कायम विना अनुदान तत्वावर (मराठी, हिंदी, उर्दू, तामिळ, इत्यादी माध्यम)

(८)

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./२/
/खा.प्रा.शा./८०/ दि.१/१०/०६

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
कै. श्री मोतीलाल गोपाळदास मथुरावाला
प्रा. वि. मंदिर नानवडी, पुणे ४०

विषय :- कायम-विना-अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना
~~नवा~~/नैसर्गिक वाढीचा/~~वाढीच्या माध्यम~~ /~~जादा तुकड्या~~/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत...
संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-व्ही.एल.एस.-१००२/ (१०००/०२) प्रा.शि.-३ दिनांक २३ सप्टेंबर २००३.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या ~~नवा~~ / नैसर्गिक वाढीचा / ~~वाढीच्या प्रथम~~/ ~~जादा तुकड्या~~ / वर्ग जून २००६ पासून ~~सन २००६ - २००७~~ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | मोतीलाल गोपाळदास मथुरावाला प्रा. वि. मं. नानवडी | मराठी | इ. २री - २००१-०२<br>इ. ३री - २००२-०३<br>इ. ४थी - २००३-०४ | प्रत्येकी एक (तुकडी नं. [illegible]) | मंजूर. |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या आधीन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकड्यासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी, (प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद, पुणे करिता

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / अध्यक्ष
महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ नानवडी, पुणे